International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 3 Jan-Feb 2024

# सुशासन

**श्री पांडुरंग पंडीत पाटील**
मु.जैताळ,पो.कांडगाव ता.करवीर,जि. कोल्हापूर
**Corresponding Author – श्री पांडुरंग पंडीत पाटील**
**Email:** pandurangp91@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13990642**

**प्रस्तावना :**

गेल्या काही दशकामध्ये सुशासन ही संकल्पना राज्यशास्त्र व लोकप्रशासन मधील एक नवीन विचारप्रणाली म्हणुन उदयास येत आहे. विकसनशील व विकसित अशा दीन सागात जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत असून आता केंद्रशासन व तेथील राजाशीय प्रक्रिया याकडे अधिक लक्ष दिले जाते. राज्य सरकार व प्रशासन यांचे अस्तित्व नुसते असुन उपयोग नाही तर राज्य कसे चालते, सरकार व प्रशासन यांचे स्वरूप काय? प्रशासनाचे व जनतेची संबंधाची प्रकिया कशी आहे याचाही विचार येथे केला पाहिजे सुशासन संबंधी प्राचीन काळात रामराज्य किंवा आदर्शराज्य अशा संकल्पनेने परिभाषेत केले जात होते.

**उद्देश :**

1. सुशासन संकल्पनाचा अभ्यास करणे
2. सुशासनातील अडथळे आणि ई -प्रशासनाचा अभ्यास करणे

**सुशासनाचा अर्थ :**

विश्वबँकेच्या १९९२ च्या रिपोर्टनुसार सुशासनाची तीन वैशिष्टये स्पष्ट कोली आहे. यामध्ये राजकीय सत्तेचा प्रकार व राजकीय व्यवस्थेचे स्वरूप, आर्थिक व सामाजिक संसाधनाचा वापर, धोरण निर्मिती व अंमलबजावणी असे वैशिष्ट्ये दिसून येत. या सुशासनात समता व सर्वसमावेशकतेला प्राधान्य, भ्रष्टाचार विरहित प्रशासन, जबाबदार कार्यपालिका, न्यायालयीन संरक्षण, प्रतिसादात्मक प्रशासन, सहभागात्मक प्रशासन, ई-गव्हर्नस्वर आधारित नागरी व प्रशासन व्यवस्था इत्यादी घटक सुशासनाच्या अंतर्गत हे घटक येत असून, या सुशासनात सहभाग, कायद्याचे राज्य, प्रतिसदात्मकता, पारदर्षकता, समता, समावेशकता, उत्तरदायित्व, कार्यक्षमता व प्रभावक्षमता यांचा अंर्तभाव होताना दिसतो.

सुशासनासंबंधी 'सु' याचा अर्थ इंग्रजीत Good असा होतो व 'शासन' म्हणजे Governs असा होतो. यातील Good हा शब्द God या शब्दापासुन उत्पन्न झाला आहे याचा अर्थ 'देव' असा होतो. यामुळे Good Governs म्हणजे ईश्वरी शासन' असा होतो. पण ईश्वरी शासन म्हणजे कोणत्याही विशिष्ट धर्माचे शासन नसून चांगले शासन होय.

**भारतातील शासन व्यवस्था आणि सुशासन :-**

भारतातील सार्वजनिक शासन व्यवस्थेमध्ये अप्रतिसादात्मक असंवेदनी व भ्रष्ट व्यवस्था असे समजले जाते. प्रशासकीय सुधारणा आयोगाने राज्यामध्ये केलेल्या भेटी-गाटी दरम्यान जनतेने आयोगाशी संवाद साधताना ब-याच प्रमाणात प्रशासनावर टिका केली आहे. त्यामध्ये सरकारी योजनामधून देण्यात येणारी सेवा संबंधी प्रशासनाची उदासिनता त्यातील भ्रष्ट्राचार, सत्तेबा होणारा दुरूपयोग, जबाबदारीचा अभाव त्याचप्रमाणे लाल फितशाही असते. असा आरोप केलेला दिसून येतो. त्याचबरोबर सरकारी सेवकासंबंधी असा समज असतो की त्यांची संख्या अधिक आहे. तसेच त्यांचे योगदान जी.डी.पी. मध्ये अधिक नगण्य आहे. तसेच सरकारी अधिकरी हे ऑफिसमध्ये येताना उशिरा येतात व कामकाजासंबंधी विनाकारण वेळ घालवतात. अशा प्रकारची टिका केली जाते. या प्रशासकीय अधिका-यानां संविधानाकडुन ३११ कलमांनी सुरक्षा प्रधान केली आहे.

**सुशासनातील अडथळे**

सुशासन व्यवस्था पाहताना आपण भारतीय व्यवस्थेतील शासन व्यवस्था पाहिली या शासन व्यवस्थेतील दोष दुर करायचे असेल व सुशासन प्रशासन प्रस्थापित करायचे असेल अशी जरी इच्छा असली तरी सुशासन प्रस्थापित करताना अडथळे येताना दिसुन येतात. यामध्ये प्रशासनामधील सेवकांमध्ये सामान्यपणे निष्वरता, स्वाभिमान, अ शितिलिकरण, या गोष्टी दिसून येतात. यांच्या परिणामी प्रशासकीय अधिकारी नागरिकांशी वागताना असंवेदपुर्ण व बेजबाबदार वागतात. ते आपण अधिकारी आहोत म्हणजे आपण श्रेष्ठ आहोत असे समजतात ते जनतेला गरिब, निरक्षर व दयेस पात्र समजतात. जनतेच्या कामाकडे तुच्छतेने बघतात. यामुळे सुशासनाची प्रक्रिया खंडित होऊन प्रशासन व जनतेमध्ये विसंवाद निर्माण होती. परिणामी शासनाच्या लोककल्याणकारी कार्यक्रम अयशस्वी होतात.

**भारतीय प्रशासनाची सुशासनाकडे प्रगती**

सुशासन निर्माण करण्यास अकार्यक्षमता, भ्रष्ट्राचार, प्रशासकीय कामात राजकीय हस्तक्षेप, दप्तर दिरंघाई, हे दोष दिसून येत असले तरी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण यांच्या पार्श्वभुमीवर शासन व्यवस्थेमध्ये आधूनिक स्वरूपात सुशासनाने शिरकाव केला आहे. १९८० नंतर जागतिक स्तरावर सुशासन संकल्पनेचा उदय झाला असला तरी १९९० नंतर ख-या अर्थाने जगातील विविध देशामध्ये ही संकल्पना चर्चेत आलेली दिसते. या संकल्पनेचा संयुक्त राष्ट्र संघटना, मानव अधिकर परिषद जागतिक बँक अशा विविध संघटनांनी या संकल्पनेचा उहापोह केला आहे. सुशासन हे साधे, नैतिक, उत्तरदायित्व, जबाबदार, पारदर्षक असले पाहिजे. सुशासनासंबंधी १९९१ नंतर भारतात मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली दिसून येते. यामध्ये माहितीचा अधिकार कायदा महत्वाचा आहे. तसेच न्यायालयीन सक्रियता, लोकन्यायालय, फिरते न्यायालय व त्यांच्या अंतर्गत संबंधित असणारे लोकन्यायालय हे प्रशासनातील व्यक्तिंच्याकडुन जनतेची होणारी अवहेलना थांबण्यास प्रयत्नशील आहेत. न्यायव्यवस्था ही सुशासनाचा आधार असून न्यायव्यवस्थेला जागृत ठेवण्यासाठी न्यायालयीन सक्रियतेने महत्वपुर्ण भूमिका बजावली पाहिजे यामुळे घटनेने जनतेला प्राप्त करून दिलेल्या अधिकारांचे संरक्षण करणे, त्यांच्यावर कार्यकारी मंडळ, तसेच प्रशासनाकडुन अधिकाराचे होणारे उल्लघंन यासंबधी न्यायालय संरक्षणाची भूमिका बजावते.

**ई - प्रशासनाची सुरूवात :-**

१९९० नंतर माहिती तंत्रज्ञानाचा वाढलेला प्रसार व त्यातुन त्याची उपयोगिता दिसुन आल्याने भारताने प्रशासनामध्ये याचा वापर सुरू केला यातुन भारत सरकारने माहिती तंत्रज्ञान कायदा करून याला कायदयाचा आधार प्राप्त करून दिला. त्यामुळे प्रशासनात सुलभता व पारदर्शीपणा वाढला व सुशासनाची प्रकिया प्रशासनात सुलभ झाली. ई- प्रशासनाच्या माध्यमातून सरकारी फाईलमध्ये पेपरलेस वर्क, सातबारा उतारासाठी सेतु, भू धारणा, शेती नोंदीसाठी वेगवेगळी सॉप्टवेअर तयार केले ज्याचा फायदा शासकीय अधिकारी प्रमाणेच जनतेला मोठ्या प्रमाणवर झाला. याची अंमलबजावणी करण्यासाठी भारतात शासनाने सिटीजन चार्टर बिल २०११ लोकसभेत मांडले आहे हे सुशासन निर्माण करण्याचा एक प्रयत्न आहे. राष्ट्रीय व राज्य महिला आयोग, राष्ट्रीय व राज्य मानव अधिकार, अनुसुचित जाती जमाती आयोग इ. या आयोगाच्या माध्यमातुन सुशासन प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न केला. तसेच शासनाच्या विविध योजनांमध्ये कार्यक्षमता निर्माण व्हावी म्हणून सार्वजनिक योजनांमध्ये खाजगी सहभागी होण्यास प्रशासनाने आता सुरूवात केली आहे. याच बरोबर प्रशासन व शासनाच्या कार्यात सामान्य जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी आणि सामुदायिक प्रोत्साहात देण्यासाठी बिगर शासकीय संस्था, स्वंयसेवी संस्था यांना प्रोत्साहान देण्याचे धोरण आखले आहे जसे महिलांच्या विकासासाठी राबविल्या जाणा-या योजनेत तसेच आरोग्य कार्यक्रमात बिगर शासकीय संस्थाचा सहभाग घेउन प्रशासनाने या योजना लोकाभिमुख बनवल्या आहेत.

**निष्कर्ष :**

अशा प्रकारे सुशासन निर्मितीचे प्रयत्न भारतात दिसून येतात. तरीपण यासाठी सुशासनाची नविन पध्दतीने मांडणी करून त्यांचा आढावा घेणे, ई-प्रशासनाचा प्रसार व प्रचार वाढवणे, सेवकाने राजकीय तटस्थता जोपासने, प्रशासनात शिस्तिच्या पालनावर अधिक लक्ष्य देणे, भ्रष्ट्राचार विरोधी मजबूत यंत्रणा व कडक कायदा करणे, सुशासनाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी सामाजिक लेखापरिक्षण करावे, शासनाच्या विविध योजनेत स्वयंसेवी संस्थाचा सहभाग पारदर्शीपणे वाढवावा.अशा प्रकारे विविध उपाय योजून सुशासनाची प्रकिया भारतात गतिशिल करणे आवश्यक आहे. चांगले व पारदर्शी प्रशासनास देशाला आर्थिक, सामाजिक महासत्तेकडे घेउन जाईल.

**संदर्भ :**

1. दूबे अशोककुमार, (२००८), “२१ वी शताब्दी में लोकप्रशासन”, टाटा मॅग्राहील कंपनी, न्यू दिल्ली.
2. शर्मा योगेंद्रकुमार, (२००६), “लोकप्रशासन के मूल सिध्दांत”, कणिष्क पब्लिशर्स, डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली.
3. वर्मा, ओ.पी. (२००१), “भारतीय प्रशासन के पंचास वर्ष”, पंचशिल प्रकाशन, जयपूर
4. प्रा.पाटील व्ही.बी, (२००९) “भारतीय प्रशासन”, के सागर प्रकाशन, पुणे.
5. सौ. पाटील यशोदा,(२००८), “ लोकप्रशासन”, निराली प्रकाशन, पुणे.